03-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/2/2025 11:02 PM Page 1



# भूस्खलनात ३ सैनिकांचा मृत्यू : ६ बेपता

## सिक्कीममध्ये भूस्खलन : सैनिकांचा शोध सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**सिक्कीम, दि. २ :** रविवारी रात्री उशिरा सिक्कीममध्ये भूस्खलन झाल्याने किमान तीन लष्करी जवानांचा मृत्यू झाला तर सहा जण बेपत्ता आहेत. ही घटना मांगन जिल्ह्यातील (उत्तर सिक्कीम) चातेन भागात घडली. तेथील एका लष्करी छावणीवर टेकडीवरून कोसळलेल्या ढिगाऱ्याची धडक झाली. ढिगाऱ्यात चार सैनिक जखमी झाले आहेत आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उर्वरित सैनिकांचा शोध सुरू आहे.

मांगन जिल्ह्यातील चुंगथांग उपविभागीय पोलिस अधिकारी अरुण थटल यांनी पत्रकारांना सांगितले की, लाचेन नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने एका लष्करी छावणीवर भूस्खलन झाले. तीन सैनिकांचे मृतदेह सापडले आहेत. बेपत्ता सैनिकांचा शोध सुरू आहे.

काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी या अपघातावर दुःख व्यक्त केले आणि लिहिले की, सिक्कीममधील लष्करी छावणीत भूस्खलन झाल्यामुळे आपले सैनिक शहीद झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. देश आपल्या शहीदांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा नेहमीच ऋणी राहील.

चाटेन हे लाचेनपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर आहे. तेथे वारंवार भूस्खलन होते. या परिसरात अनेक लष्करी छावण्या आहेत. मृत लष्करी जवानांची ओळख हविलदार लखविंदर सिंग, लान्स नाईक मुनीश ठाकूर आणि पोर्टर अभिषेक लखडा अशी झाली आहे. मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे उत्तर सिक्कीममधील मंगन भागात सर्वाधिक नुकसान झाले आहे.

सोमवारी, ३१ मे पासून या भागात



अडकलेल्या सुमारे १५०० पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.मंगन जिल्ह्याचे जिल्हा दंडाधिकारी अनंत जैन यांच्या मते, आताही सुमारे १५० पर्यटक लाचेनमध्ये अडकले आहेत. परंतु ते हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत.

## निवडक

### भिले सूर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २ :** मंगळवार दि. ३ जून रोजी भिले सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने भिले सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### ट्रॅव्हॅस्को हाईट फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** ११ केव्ही ट्रॅव्हॅस्को हाईट फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. ३ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत वाटिका को.ऑप. सोसायटी आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### पैंगीणच्या सरपंच सविता तवडकर यांची आज दूरदर्शनवर मुलाखत

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २ :** श्री बलराम शिक्षण संस्थेच्या निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका तथा पैंगीणच्या सरपंचा सविता तवडकर यांची उद्या मंगळवार दि. ३ रोजी संध्याकाळी ७ वाजता गोवा दूरदर्शनवर मुलाखत प्रक्षेपित होईल. यावेळी मुलाखतकार श्रुती हजारे त्यांच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेतील. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांचा वावर, तसेच श्रमदान संकल्पना, रान भाजी उत्सव, बलराम शिक्षण संस्थेचे कार्य, आदी विषयांवर त्या भाष्य करणार आहेत.

### हरमलात समुद्रकिनाऱ्यावर मासेमारीस बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २ :** पावसाळा सुरू झाला की खोल समुद्रात मासेमारी बंदीचे दिवस सुरू होतात. एरवी गोमंतकीय ताज्या मासळीसाठी सकाळपासून धावधाव करीत असतो,त्यामुळे आणखीन दोन महिने समुद्रातील ताज्या मासळीला मुकण्याची मानसिकता खवय्ये लोकांत आहे.

काल या भागातील मच्छिमार बांधवानी होड्या, यांत्रिक होड्या, मशीन व जाळी आयुधे सुरक्षित स्थळी ठेवली असून आणखीन दोन महिने ताजी मासळीची आवक बंद राहील असे वाटते.

दरम्यान,अलीकडे किनाऱ्यावर थांबून मासेमारी करण्याचे नवे परिमाण आल्याने कित्येक मच्छिमार त्याकडे वळले आहेत.रॉकेट हे खोल समुद्रात पाण्याच्या प्रवाहात जाते तर पागेरी जाळी ही एक दीड मीटर पाण्यात उभे राहून पागेरे टाकावे लागते.किनारीनजीक पाण्यात मासळी आल्यास, मासळी अलगद जाळ्यात सापडू शकते, असे मत मच्छिमार गोपाल पेडणेकर यांनी सांगितले.

सध्या, या भागात तेरेखोल, शिरोडा व अन्य भागातील ताजी मासळीवर दिवस ढकलावे लागतील असे खवय्ये बोलत आहे.कित्येकजण गरोवणी घेऊन किरणपाणी, केरी समुद्रात खडकाळ भागात तसेच आरोंदा पुलावर गरोवणी करताना दिसतात. मासळी महाग असल्याने अवघ्या मासळीवर ताव मारावा लागतो.सध्या सुक्या मासळीला सुगीचे दिवस असल्याने बांगडे व लहान सुंगटे( किसमिस)करून दिवस जात असल्याचे एका खवय्याने सांगितले.

### दक्षिण गोव्यात पोहणे आणि धबधब्यांमध्ये प्रवेश करण्यास बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** दक्षिण गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी दक्षिण गोवा जिल्ह्याच्या हद्दीतील धबधबे, खाणी, नद्या, तलाव आणि इतर तत्सम नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये पोहणे, आंघोळ करणे किंवा प्रवेश करण्यास बंदी लागू केली आहे. पावसाळ्यात दक्षिण गोवा जिल्ह्यातील विविध नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये बुडण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने हा आदेश जारी करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत शिक्षा होईल.

### गतिरोधक उभारण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** उत्तर गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी पेडणे येथील कोरगाव पेडणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर क्रमांक बीटी एफ१/४ असलेल्या विद्युत खांबापासून ६ मीटर अंतरावर हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्याचा आदेश दिला आहे. त्याचप्रमाणे ताळगाव येथील तांबडी माती येथील सर्व्हे क्रमांक ११८/३ रस्त्यावर ताळगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी 'नो पार्किंग विभाग जाहीर केला आहे.

### मच्छिमारी प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी अर्ज

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** मत्स्योध्योग संचालनालयाने जुने गोवा येथील एला धावजी येथील मच्छीमार प्रशिक्षण केंद्रात १ जुलै पासून सुरू होणाऱ्या सहा महिने कालावधीच्या मच्छिमारी प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविले आहेत. या अभ्यासक्रमात मासेमारी हस्तकला आणि उपकरणे, नेव्हिगेशन आणि सीमनशिपची मूलभूत तत्त्वे, आणि मरीन डिझेल इंजिनची देखभाल आणि ऑपरेशन, आधुनिक जाळी विणणे, सीफूड मूल्यवर्धन आणि मार्केटिंग, मत्स्यपालन आणि मत्स्यालय बनविणे आणि पोहणे या विषयांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. किमान आठवी उत्तीर्ण आणि १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवार प्रवेशासाठी पात्र आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना तसेच समुद्रात अनुभव असलेल्या मासेमारी समुदायातील तरुणांना प्राधान्य दिले जाईल. सदर अभ्यासक्रमासाठी फक्त २० जागा उपलब्ध आहेत.

या अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना दरमहा १००० रुपये विध्यावेतन आणि दररोज १०० रुपये महागाई भत्ता दिला जाईल. इच्छुक उमेदवारांनी अर्जासाठी मच्छीमार प्रशिक्षण केंद्र, एला धावजी जुने गोवा किंवा मुख्य कार्यालय, मत्स्योध्योग संचालनालय, पणजी किंवा जवळच्या मत्स्योध्योग संचालनालयाच्या उप–कार्यालयांशी संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या लॅंडलाईन क्रमांक ०८३२–२२२४८३८ वर संपर्क साधावा किंवा मत्स्योध्योग अधिक्षक डॉ सुनिता पाऊसकर यांच्या ९८५०७६४५५४ वर संपर्क साधावा किंवा मेकानिकल इन्स्ट्रक्टर श्री सिध्देश केरकर यांच्याशी ९४२१२४८७९२ वर संपर्क साधावा किंवा www.fisheries.goa.gov.in वेबसाइट ला भेट द्या.

उमेदवारांनी पूर्ण भरलेले अर्ज मच्छीमार प्रशिक्षण केंद्र, एला धावजी, जुने–गोवा येथे सादर करावेत. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख २० जून २०२५ अशी आहे.

### 'सम्राट संगीत सितारा' प्राथमिक स्पर्धा फेरीचे २१ रोजी आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २ : सम्राट क्लब इंटरनॅशनल राज्य एक आयोजित 'सम्राट संगीत सितारा' प्राथमिक स्पर्धा फेरीचे आयोजन शनिवार दि. २१ जून रोजी ३ वाजता कला व संस्कृती संचालनाय पाटो–पणजी येथे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्दिष्ट नवोदित शास्त्रीय संगीत प्रतिभेसाठी त्यांचे कौशल्य दर्शविण्यासाठी आणि भव्य रंगमंचावर चमकण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे या स्पर्धेमुळे संगीत उत्साही आणि सहकाराचे मोठे प्रेक्षक आकर्षित होतील प्रकल्प अधिकारी शिल्पा साखळकर यांनी सर्व संगीत प्रेमींना या कार्यक्रमास सामील व्हावे, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी शिल्पा साखळकर ९९९९८९२९५१ यांच्याशी संपर्क साधावा

# मटण कॉम्प्लेक्स परिसरात सार्वजनिक मेळाव्यांवर निर्बंध

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर संभाव्य तणाव टाळण्यासाठी, दक्षिण गोवा जिल्हा प्रशासनाने फोंडा तालुक्यातील उसगाव येथील गोवा मीट कॉम्प्लेक्स परिसरात सात दिवसांसाठी सार्वजनिक मेळाव्यांवर निर्बंध लागू केले आहेत. हे आदेश सोमवार, २ जूनच्या पहाटेपासून लागू होणार असून, ९ जूनच्या मध्यरात्रीपर्यंत प्रभावी राहतील.

दक्षिण गोव्याच्या जिल्हा दंडाधिकारी एग्ना क्लीटस यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत हा प्रतिबंधात्मक आदेश काढला आहे. या आदेशानुसार, गोवा मीट कॉम्प्लेक्स आणि प्रस्तावित आधुनिक कत्तलखान्याच्या एक किलोमीटर परिघात चार किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे.

फोंडा उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी मागील वर्षी बकरी ईद दरम्यान परिसरात झालेल्या घटनांचा हवाला देत सार्वजनिक शांततेस धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली होती. २०२३ मध्ये गोवा मीट कॉम्प्लेक्सजवळ कत्तलविरोधी घोषणाबाजी, बॅनर लावणे आणि धमकी दिल्याचे प्रकार घडले होते. त्यामुळे यावर्षी अशा प्रकारच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने खबरदारीचे उपाय राबवले आहेत.

बकरी ईदच्या तयारीचा एक भाग म्हणून, ऑल गोवा मुस्लिम जमात असोसिएशनकडून बुधवारपासून शनिवारपर्यंत आधुनिक कत्तलखान्यात जनावरांची वाहतूक केली जाणार आहे. या प्राण्यांची आयात इतर राज्यांमधून धारबांदोडा तालुक्यातील मोले गेट आणि काणकोण तालुक्यातील पोळे गेटमार्गे केली जाणार आहे.

वाहतुकीदरम्यान गोवा उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय सेवा विभागाचे अधिकारी या दोन्ही प्रवेशद्वारांवर नियुक्त करण्यात येणार आहेत. सप्टेंबर २०१४ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, अशा वाहतुकीवर लक्ष ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

प्राथमिक प्रस्तावानुसार पोलिसांनी चार किलोमीटर व्याप्तीचा आणि नऊ दिवसांचा कालावधी असलेल्या निर्बंधांची शिफारस केली होती. मात्र, अंतिम आदेशानुसार ही मर्यादा एक किलोमीटरपर्यंत कमी करण्यात आली असून, कालावधी सात दिवसांपर्यंत मर्यादित आहे. जिल्हा प्रशासनाच्या मते, हे निर्बंध सणाच्या काळातील संवेदनशीलता, संभाव्य कायदा आणि सुव्यवस्थेच्या अडचणी टाळण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे कोणत्याही सामाजिक किंवा धार्मिक अशांततेला आळा घालण्याचा उद्देश यामागे आहे.

आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ नुसार संबंधित व्यक्तींवर दंडात्मक कारवाई केली जाईल. फोंडा उपजिल्हाधिकारी आणि उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना या आदेशाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याचे आणि उल्लंघन करणाऱ्यांविरोधात योग्य न्यायालयात तक्रार दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

मडगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयाने सोमवार, २ जून रोजी हा आदेश अधिकृतपणे जारी केला असून, बकरी ईदच्या काळात कत्तलखान्याच्या परिसरात कोणतीही सांप्रदायिक किंवा व्यावसायिक अस्थिरता निर्माण होऊ नये, यासाठी दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या खबरदारीच्या उपाययोजनांचा हा भाग आहे.

# नव्या घाऊक मासळी बाजाराच्या कार्यपद्धतीबाबत स्पष्टतेची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** मडगाव येथील एसजीपीडीए अंतर्गत विकसित होत असलेल्या नव्या घाऊक मासळी बाजाराच्या कार्यपद्धतीबाबत पारंपरिक मच्छीमार, बोट मालक आणि घाऊक व्यापाऱ्यांनी पारदर्शकतेची मागणी केली आहे.

बाजाराचे कामकाज सुरू होण्याआधी व्यापारी ब्लॉक्सचे वाटप कशा पद्धतीने केले जाणार, याबाबत स्पष्ट दिशा आणि नियोजन हवे, अशी मागणी सागरी समुदायाकडून करण्यात आली आहे. पारंपरिक मासेमारी करणाऱ्या घटकांसाठी स्वतंत्र विभाग असावा, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

उद्योगाशी संबंधित भागधारकांच्या मते, या बाजार प्रकल्पाचे यश हे प्रामुख्याने त्याच्या ऑपरेशनल बाबी पूर्वनियोजित आणि समन्वयबद्ध असण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे बाजार सुरू होण्याआधीच योग्य धोरणे, नियमावली आणि कार्यसंस्था निश्चित करणे आवश्यक असल्याचे ते म्हणतात. फातोर्डा मतदारसंघाचे आमदार आणि गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी बाजारातील आवश्यक सुविधांच्या देखभालीसाठी कार्यक्षम व्यवस्थापन प्रणालीची गरज अधोरेखित केली. सार्वजनिक शौचालये, स्वच्छतेची साधने आणि इतर मूलभूत सुविधा कार्यक्षम असाव्यात, अशी त्यांची भूमिका आहे. बाजाराचा दर्जा टिकवण्यासाठी आणि शाश्वत व्यवस्थापनासाठी हे पाऊल अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने नव्या बाजार इमारतीवर लावलेल्या

## ब्लॉक वाटपावरून मच्छीमारांचा आक्षेप

भित्तीचित्रांवर झालेल्या टीकेनंतर त्या कलाकृतींमध्ये बदल केले आहेत. मूळ चित्रांमध्ये व्हेल आणि डॉल्फिन यांसारख्या सागरी सस्तन प्राण्यांचे चित्रण होते. मात्र हे प्राणी वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार संरक्षित असून पारंपरिक मासेमारीचा भाग नाहीत, असे स्थानिक मच्छीमारांचे म्हणणे होते. या वादानंतर, स्थानिक मासे आणि गोव्याच्या समुद्रात सहज आढळणाऱ्या प्रजाती दाखवणारी नवी चित्ररचना तयार करण्यात आली आहे. जीएसआय डीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत स्पष्टीकरण देताना सांगितले की, आमचा हेतू कधीही संरक्षित प्रजातींच्या व्यापाराचा संदेश देण्याचा नव्हता. नवीन चित्रण हे गोव्याच्या पारंपरिक मासेमारी संस्कृतीचे अधिक चांगले प्रतिबिंब ठरेल.

गोव्याच्या मच्छीमार समाजाचे वास्तव आणि सांस्कृतिक अधिष्ठान योग्य पद्धतीने प्रतिबिंबित व्हावे, यासाठी आमदार सरदेसाई यांनी भित्तीचित्रे बदलण्याची मागणी केली होती. या मागणीला मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचीही पाठिंबा लाभल्याचे समजते, आणि त्यानुसारच हे बदल अमलात आणले गेले. संपूर्ण मासळी बाजार प्रकल्प हा गोव्यातील मासेमारी क्षेत्राच्या आधुनिकीकरणाचा एक महत्त्वाकांक्षी टप्पा मानला जात आहे. मात्र, या प्रकल्पाचे खरे यश हे स्थानिक व्यापारी आणि पारंपरिक मच्छीमारांच्या चिंता, विशेषतः कार्यपद्धती, ब्लॉक वाटप आणि देखभाल यावर योग्य उत्तर देण्यातच आहे, असे बाजाराशी संबंधित भागधारक स्पष्टपणे सांगत आहेत.

# डिजिटल परवाना प्रणालीमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## मडगावातील धोकादायक इमारतींमध्येही व्यवसाय सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** मडगाव नगर परिषदेकडून सध्या वापरात असलेल्या डिजिटल व्यापार परवाना प्रणालीमुळे धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. केवळ ऑनलाइन कागदपत्रांच्या आधारे परवाने दिले जात असल्याने, संरचनात्मक तपासणीचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले असून, त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

सद्यस्थितीत व्यापाऱ्यांना कोणत्याही इमारतीत व्यवसाय सुरू करण्यासाठी केवळ दस्तऐवज अपलोड करून काही दिवसांत परवाना मिळवता येतो. मात्र, इमारतीच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी किंवा तिची संरचनात्मक स्थिती तपासण्यासाठी कोणतीही सक्तीची अट नाही. यामुळे धोकादायक ठरवण्यात आलेल्या अनेक जुन्या इमारतींमध्येही व्यवहार सुरू आहेत.

मडगाव नगर परिषदेने गोवा नगरपालिका कायद्यातील कलम १९० अंतर्गत ५६ इमारतींना 'पडण्याच्या स्थितीत' असल्याचे जाहीर केले असले, तरी त्या इमारतींमध्ये आजही अधिकृत परवाना घेतलेल्या व्यावसायिकांकडून दुकाने चालवली जात आहेत. या विसंगतीमुळे परवाना प्रणाली आणि संरचनात्मक सुरक्षा व्यवस्थेमध्ये समन्वयाचा अभाव स्पष्ट होतो.

माजी मुख्याधिकारी गौरीश शंखवाळकर यांना इसिडोरियो बाप्टिस्टा रोडवरील एका धोकादायक इमारतीत तळमजल्यावर दुकान सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. विशेष म्हणजे, त्या व्यापाऱ्याला संबंधित इमारतीला निषेध नोटीस बजावण्यात आल्याचे माहितच नव्हते. यावरून परवानाधारकांना इमारतीच्या स्थितीबाबत योग्य माहिती न दिली जाण्याचे वास्तव समोर आले. धोकादायक इमारतींना परवाने जारी करणे म्हणजे सुरक्षा व्यवस्थेच्या मूळ हेतूलाच हरताळ फासण्यासारखे आहे, असे एक स्थानिक कायदेतज्ज्ञ म्हणाले.

गेल्या आठवड्यात बँक ऑफ बडोदा इमारतीच्या धोकादायक भागाचे पाडकाम करण्यात आले, तेव्हा या मुद्याचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित झाले. या कामादरम्यान तीन वाहनांचे नुकसान झाले होते. या घटनेनंतर जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार तातडीचे पाडकाम करण्याचे आदेश दिले.

तथापि, आणीबाणीची ही कारवाई केवळ एका इमारतीपुरती मर्यादित नसून संपूर्ण प्रणालीतील दोष दर्शवणारी आहे. नगरपरिषदेने ज्या ५६ इमारतींना नोटिसा दिल्या, त्यापैकी केवळ २१ इमारतींचा तपशील जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला होता. उर्वरित इमारतींबाबत कोणतीही स्पष्टता अद्याप उपलब्ध नाही.

या इमारतींच्या पाडकामाचा खर्च मामलतदार कार्यालयामार्फत संबंधित मालकांकडून वसूल करण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील कलम ४९ अंतर्गत निधी वितरित करण्याचे निर्देशही दिले आहेत.

माजी मुख्याधिकारी शंखवाळकर यांनी आपल्या कार्यकाळात एमएमसीच्या तांत्रिक विभागाला प्रणालीमध्ये सर्व धोकादायक इमारती स्पष्टपणे चिन्हांकित करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्या आदेशांची अंमलबजावणी अद्यापही प्रलंबित आहे. एक वरिष्ठ अधिकारी म्हणाले की, जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यासाठी प्रलंबित असलेल्या संरचनांची यादी तयार केली जात आहे.

पावसाळा तोंडावर असताना, मडगावातील जुन्या इमारतींच्या स्थितीबाबत आणि सध्याच्या परवाना प्रणालीच्या कार्यपद्धतीबाबत चिंता वाढत आहे. सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने, व्यापार परवाना प्रक्रियेत प्रत्यक्ष इमारत पाहणी व संरचनात्मक तपासणी अनिवार्य करण्याची गरज आता भासू लागली आहे.

# जहाजांचे सुरक्षा ऑडिट करण्याची काँग्रेसची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** गोवा प्रदेश काँग्रेस समितीने राज्यातील बंदरांच्या हद्दीत कार्यरत सर्व जहाजांचे सार्वजनिक सुरक्षा आणि संरचनात्मक (स्ट्रक्चरल) ऑडिट तात्काळ करण्याची मागणी करताना कॅप्टन ऑफ पोर्ट्स विभागाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. ही कारवाई न झाल्यास काँग्रेसने थेट निषेध आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पणजीतील काँग्रेस भवनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना, गोवा प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणालेकी, मांडवी नदीतील मालीम जेटी येथे नुकत्याच घडलेल्या प्रवासी जहाजातील आगीच्या घटनेचा संदर्भ देत, जीपीसीसीने हा प्रकार सीओपी विभागाच्या निष्काळजीपणाचे धक्कादायक उदाहरण असल्याचे नमूद केले.

बंदर विभागाकडे कोणतेही प्रभावी सुरक्षा उपाय नाहीत. जर जहाजांवर आपत्कालीन परिस्थिती उद्भवली, तर ती हाताळण्यासाठी आवश्यक साधनसामग्री किंवा कर्मचारी तैनात नाहीत. ही गोष्ट अत्यंत गंभीर असून जनतेच्या सुरक्षेशी प्रत्यक्ष तडजोड करणारी आहे, असा आरोप कॉन्ग्रेसने केला आहे.

पाटकर यांनी पुढे स्पष्ट केले की, इंटरनॅशनल शिप अँड पोर्ट फॅसिलिटी कोड, जो आंतरराष्ट्रीय स्तरावर बंदर व जहाज सुरक्षेसाठी अनिवार्य आहे, तो कोड आजतागायत सीओपी विभागाने लागू केलेला नाही. याशिवाय, विभागात रेडिओ अधिकारीच उपलब्ध नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. सध्या जहाजांवर रेडिओ कम्युनिकेशनच कार्यरत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर जलवाहतूक सुरू असताना याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे धोका निमंत्रण देण्यासारखे आहे, असा आरोप त्यांनी केला.भारतीय शिपिंग रजिस्ट्रार च्या नियमानुसार निरीक्षण व्हायला हवे, मात्र सध्या त्याचे कोणतेही पालन होत नसल्याचे दिसते,असेही त्यांनी सांगितले.

गोव्याच्या किनारी भागात आणि मांडवी नदी परिसरात रात्रीच्या वेळी जहाजांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी सर्व पुलांवर योग्य रंग व प्रकाश चिन्हांकने (लाईट मार्किंग) करणे अनिवार्य असल्याचे कॉन्ग्रेसअध्यक्षानी स्पष्ट केले. तसेच, जी जहाजे खठड चे मानांकन प्राप्त नसतील, त्यांना त्वरित जलवाहतुकीतून वगळण्याची मागणी त्यांनी केली.

जर बंदर विभागाने पुढील १५ दिवसांत ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर काँग्रेसकडून कॅप्टन ऑफ पोर्ट्स कार्यालयासमोर जाहीर निषेध आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशाराही पाटकर यांनी दिला. या पत्रकार परिषदेस जीपीसीसी प्रवक्ते श्रीनिवास खलप, उत्तर गोवा काँग्रेस अध्यक्ष वीरेंद्र शिरोडकर, मोहन धोंड आणि पणजी ब्लॉक काँग्रेस अध्यक्षा प्रतिभा बोरकर हेही उपस्थित होते.

**VIKAS PARISHAD MANDRE**
**MANDRE COLLEGE OF COMMERCE, ECONOMICS & MANAGEMENT, MANDRE-GOA.**
**(Recognised by Govt. Of Goa, Affiliated to Goa University)**

Applications with full Bio-data are invited from Indian Citizens for the following post of Assistant Professor on Lecture Basis for the academic year 2025-26 along with self certified copies of statement of marks to the Principal, VP's Mandre College of Commerce, Economics and Management, Mandre - Goa. Applications should reach within 15 days from the date of publication.

| Sr. No. | Subject | No. of posts | Lecture basis |
|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor in Commerce | 02 (1 Odd semester, 01 Maternity leave)) | Lecture Basis |
| 2 | Assistant Professor in Environmental Studies | 01 | Lecture Basis |
| 3 | Assistant Professor in Law | 01 (only for odd Semester) | Lecture Basis |
| 4 | Assistant Professor in Marathi | 01 | Lecture Basis |
| 5 | Assistant Professor in Economics | 01 | Lecture Basis |
| 6 | Assistant Professor in English | 01 | Lecture Basis |
| 7 | Assistant Professor in Mathematics | 01 | Lecture Basis |
| 8 | College Counsellor | 01 | Contract Basis |

Essential Qualifications, pay scale and Eligibility conditions for the appointments are as per UGC/Goa University Statute SA-19, SA-20/DHE, Govt.of Goa. For details please refer to the website: https://www.unigoa.ac.in/ www.mandrecollege.ac.in
Out of the above post at sr.no. 1 to 7 two post will be reserved for OBC, one for ST, and one for EWS.

**Adv. Ramakant D. Khalap**
**CHAIRMAN**